अयोध्या प्रकरणाच्या निषेधार्थ काँग्रेसचा सत्याग्रह

दोषींवर कठोर कारवाई व धार्मिक स्थळांची सुरक्षा बळकट करण्याची मागणी

विदर्भ मतदार प्रतिनिधी

बडनाळ. उत्तर प्रदेशातील अयोध्या येथील श्रीराम मंदिर परिसरात पडलेल्या कथित बनावट चोरी प्रकरणाच्या निषेधार्थ शहर व तालुका काँग्रेस कमिटी, यवतमाळ यांच्या वतीने मंगळवारी (दि. १४ जुलै) स्थानिक दत्त चौकातील श्री दत्त मंदिर परिसरात आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनादरम्यान संबंधित प्रकरणाचा निष्पक्ष व सखोल तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी श्रीराम मंदिरासह देशातील सर्व प्रमुख धार्मिक स्थळांची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आंदोलनानंतर शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी आमदार बाळासाहेब मांगुळकर, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, प्रा. मीनाक्षी साबळकर आणि वासुदेव महाडे यांनी धार्मिक स्थळांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये, अशी भूमिका मांडली. श्रीराम मंदिर परिसरातील कथित चोरीच्या घटनेचा निष्पक्ष तपास करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी ढोक, आयुषी देशमुख, राजेंद्र गौतम पाटील, सुनील बोरकर, नगराध्यक्ष विशाल पावडे, छोटू सयवी, नंदू कुडमेथे, राजू राजगुरे, गिरीश खटेडिया, जुबेर सय्यद, नईम पैलवान, जगभ गुन्हाने, औकात रेंबे, शालिनी रेंबे, नरेश पवार, पुष्पाल होळे, बबू जाधव, प्रकाश राठोड, बाबू जाधव, बिजोर बडे, डॉ. अनंत सूर्यकर, रवी शंभरकर, अजाबराव रणखाम, विलास राठोड यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

विजय चव्हाण यांची पोलीस जमादारपदी पदोन्नती

विदर्भ मतदार प्रतिनिधी

आर्णी. आर्णी पोलीस ठाण्यात कर्तव्य असलेले पोलीस उपनिरीक्षक दुर्योधन राठोड यांचे विश्वासू सहकारी तथा पोलीस नायक विजय श्रीहरी चव्हाण यांची पोलीस जमादारपदी पदोन्नती करण्यात आली आहे. त्यांच्या पदोन्नतीबद्दल पोलीस विभाग, विश्वासिका आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली जबाबदारीने बजावलेल्या सेवेमुळे विजय चव्हाण यांचा अल्पावधीतच पोलीस दलात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना ही पदोन्नती देण्यात आल्याने पोलीस सहकारी आणि विश्वासिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. बाभुळगी पोलीस कर्मचारी व विश्वासिकांच्यावतीने विजय चव्हाण यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पुढील सेवाकाळासाठी शुभेच्छा देत, त्यांच्या कर्तव्यदक्ष सेवेमुळे पोलीस दलाची प्रतिमा अधिक उजळेल, असा विश्वास उपनिरीक्षकांनी व्यक्त केला. विजय चव्हाण यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी उज्ज्वल भवितव्याच्या सदिच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

रतन चंदन यांचे निधन

विदर्भ मतदार प्रतिनिधी

पुसद. येथील परदेशी धोबी समजातील जेष्ठ मार्गदर्शक रतन बलराम चंदन (वय ७४ वर्ष) यांचे आज दि. १४ जुलै रोजी दुपारी १ वाजता हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, ४ विवाहीत मुली, भाऊ, बहीणी व बराच मोठा आप्त परिवार आहे. उद्या दि. १५ रोजी सकाळी ११ वाजता अंत्यविधी होईल.

शिक्षक दाम्त्याच्या घरावर चोरट्यांचा डल्ला

चांदोरे नगरातील घरफोडीत रोख व दागिन्यांसह ३.८० लाखांचा ऐवज लंपास

विदर्भ मतदार प्रतिनिधी

यवतमाळ. यवतमाळ शहरातील छत्रपतीच्या घटनेनंतर बोधवाडी पाच येत नसून, चारोरी नगर परिसरात शिक्षक दाम्त्याच्या बंद घराचा चोरट्यांनी धाडसी डल्ला मारत रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख, ८० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना मंगळवारी (दि. १३) संध्याकाळी उघडकीस आली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश विनोद गावे (वय ३०) हे पोलीसांच्या सोटी अगदीच सामान्य सावकी वाल्या एरी वाहतुकीने राहतात. तोपरी होती केंद्रीय एका खासगी शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. रविवारी सायंकाळ सुट्टी असल्याने ते शनिवारी (दि. ११) शाळा आटोपून आपल्या मूळगावी धामणगाव पाळजाळा येथे गेले होते. सोमवारी सकाळी ते यवतमाळात परतले आणि भेट शाळेत कर्तव्यावर रुजू झाले. सायंकाळी ही परतल्यावर घराच्या मुख्य दरवाजाचा कोंडा तुटलेला दिसला. घरात प्रवेश केल्यावरच कपाट फोडून त्यातील साहित्य विखुरलेले दिसून आले. ते पाहताच गणेश गावे यांनी तातडीने शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. पोलीस निरीक्षक गणेश पाडे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी पोलीस पथक दाखल झाले. श्वान पथक आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांच्या मदतीने घटनेचा तपास करण्यात आला. प्राथमिक तपासात चोरट्यांनी घराच्या मागील बाजूस असलेल्या खिडकीचे गज वाकवून आत प्रवेश केल्याचे निदर्शनास आले. घरातील कपाटे उघडून त्यातील सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास करण्यात आल्याचे समोर आले. या प्रकरणी गणेश गावे यांच्या तक्रारीवरून शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक दिलीप राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

शेतकऱ्यांच्या हक्काचे कार्यालय गावकुसाबाहेर, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचा भोंगळ कारभार

विदर्भ मतदार प्रतिनिधी

पुसद : देशाचा पोशिंदा असलेला शेतकरी शासन आर्थिक सक्षमतेची सुरुवात देत आहे. सध्याच्या डिजिटल वातावरणात शेतकऱ्यांना जाती-धर्मात विभागून स्वतः वेगळ्या पंक्तीत बसून घेण्याऐवजी राजकीय नेत्यांना रस असल्याचे चित्र आहे.

जनतेच्या विकासाच्या नावाखाली काही मंडळी स्वतः शाश्वत विकास साधण्यात मग्न आहेत. पाप, या सगळ्या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. पुसद तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि विविध शासकीय योजनांच्या अमलबजावणीसाठी प्रशासनाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय स्थापन केले आहे.

पाप, पुसद येथील हे कार्यालय मेहकीच वाहतूकीच्या गोंधळात गाडले आहे. हे कार्यालय गावकुसाबाहेर किंवा शहराशापासून लाख असल्याने प्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना ते शोधणे कठीण झाले. यामुळे अनेकदा शेतकरी शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. सध्या हे कार्यालय पुसद शहरापासून दूर असलेल्या श्रीरामपूर परिसरात स्थलांतरित करण्यात आले आहे.

मर्यसामान्य गरीब शेतकऱ्यांना हे कार्यालय शोधणही कठीण झाले आहे विशेषतः अतीकडून प्रवासीर कसरीपासून सोयाबीन, तूर आणि कापूस उत्पादक अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या मोफत बियाणे वाटप योजनेचा लाभ अनेक शेतकरी घेऊ शकले नाहीत. कार्यालयाचा पत्ता आणि त्याबद्दलची माहिती वेळेवर व मिळाल्याने आणि अनिश्चित अर्ज करण्याची प्रक्रिया माहितीअभावी पूर्ण न करता आल्याने शेतकरी लाभापासून दूर राहिले. जर हे कार्यालय पुनर्: शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असते, तर अनेक शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा घेता आला असता. शहरामध्ये पुरेशी जागा उपलब्ध असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे कार्यालय शहराबाहेर स्थलांतर का घेतले, हा प्रश्न आता शेतकऱ्यांच्या परिषदा झाल आहे. या स्थानीकांचाही विविध शंका उपस्थित होत आहेत. या परिस्थितीबाबत ना अनाधारी पक्षाला देणेघेणे आहे, ना विरोधी पक्षाला. शेतकरी संघटनांही या मुद्यावर मूग गिळून गप्प आहेत. याचाच अर्थ शेतकऱ्यांच्या वाली कोणीच उरलेला नाही.

जाहीर नोटीस

यात मी आकाश संभाजी गुजरकर रा. जांबरोड, बेले लेआउट वडगांव, यवतमाळ ता. जि. यवतमाळ सर्वत्र आमजनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळवित आहे की मौजा वडगांव रोड, बेले लेआउट नगर परिषद यवतमाळ हद्दीतील ता.जि. यवतमाळ येथील खुले प्लॉट्स, शेत सर्व्हे नंबर १७/२ मधील लेआउट प्लॉट नंबर १०/२, क्षेत्रफळ २२७३ चौ. फुट हे प्लॉटस सौ. दुर्गा सतिष मिठे रा. वडगांव रोड यवतमाळ ता. जि. यवतमाळ आणि सौ. रूखमा साहेबराव बुटले रा. सिंधीनीया नगर यवतमाळ ता. जि. यवतमाळ, ह.मु. पुणे यांच्याकडुन विकत घेण्याचा सौदा केला असुन याबाबत दि. १२/०७/२०२६ रोजी इसार दिलेला आहे.

सबब या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र आमजनतेस कळविण्यात येते की सदरहु खुला प्लॉटस्या, व्यवहारा बाबत कोणताही मालकी हक्क, कुळ, बोजा, वारसा, कब्जा, वीज, कर्जा, गहाण, विक्री, मृत्यपत्र, बक्षीसपत्र, नोटरी करारनामा, न्यायाप्रवीन वाद, व इतर कोणताही हक्क संबंध किंवा उजर असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासुन ७ दिवसाच्या आत त्या संबंधातील पुराव्या कामी असलेले सर्व कागदपत्रे घेवुन लेखी आक्षेप माझेकडे नोंदवावा. वरिल मुदतीत कोणत्याही व्यक्तीचा आक्षेप न आल्यास सदरील खुला प्लॉटस निष्कलंक असुन वरिल व्यक्तीच्या मालकीची आहे असे गृहीत धरून मी सात दिवसाच्या मुदती नंतर सदरील व्यक्ती सोबत मी नोटराईज्ड सौदेपत्र करून घेईल व त्यानंतर खरेदी करेल त्यानंतर कोणाच्याही आक्षेप वा हरकतीचा विचार केला जाणार नाही करिता नोटीस असे.

(आकाश संभाजी गुजरकर)
यवतमाळ — रा. जांबरोड, बेले लेआउट वडगांव,
दिनांक : १४/०७/२०२६ — यवतमाळ मो.नं.९६५७९५५९३६

कत्तलीसाठी नेली जाणारी २७ जनावरे पोलिसांनी केली मुक्त

दोन वाहने जप्त; २९.८० लाखांचा मुद्देमाल हस्तगत, चौघांविरुद्ध गुन्हा

विदर्भ मतदार प्रतिनिधी

पांढरकवडा. कत्तलीसाठी अवैधरित्या तेलंगणाकडे नेली जात असलेल्या २७ गोवंशीय जनावरांची मुक्तता करण्यात पांढरकवडा पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत दोन मालवाहू वाहनांसह एकूण २९ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार आरोपींविरुद्ध विविध कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या प्रकरणी आकाश पोचीराम पुसनाक (रा. शिवाजीनगर, ता. बाभुळगाव), धनंजय दिनेश राय (रा. गोसपूर) आणि रौनकुमार सुदीप राय (रा. ब्रह्मपुरी पोखरा, बिहार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी पिकअप वाहन (क्र. TS-१६-UB-२०७६) आणि ट्रक (क्र. TS-१२-UD-३४०८) मधून नागपूरकडून हैदराबाद (तेलंगणा) येथे गोवंशीय जनावरे आणि घडली कत्तलीसाठी घेऊन जात होते. जनावरांना आखंड अमानुष पद्धतीने आवळून दोरीने बांधून, वाहतूकी न देता वाहतूक केली जात असल्याची माहिती जिल्हातील पोलिसांनी मार्गावर राबून दोन्ही वाहने अडवली.

पंचासमक्ष वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये ४ गोवंशीय बैल तसेच २३ म्हशी व मडके, अशी एकूण २७ जनावरे आढळून आली. प्राण्यांची क्रूरतेने वागणूक दिल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी दोन्ही वाहने व जनावरे जप्त केली.

मुक्त करण्यात आलेल्या जनावरांना वाहतूकी व सुरक्षितेच्या दृष्टीने नगर परिषद कोंडवाडा, पांढरकवडा येथे हलविण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक धोराव तसेच सहायक पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी संजय अजबराव साळवे यांच्यासह पोलीस निरीक्षक एल.डी. तावरी, पोलीस हवालदार राम राठोड, सुनील कुठावार आणि ना.पो.का. सुनील राठोड यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ स्वारस्य अभिव्यक्ती प्रकटन (EOI)

शासनाकडून प्राप्त विधिवत बाधणात आलेली अद्ययन कलाप अभ्यासिका, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत संस्थेला भाडे तत्वावर चालविण्याकरीता शाळेची आहे. त्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे तसेच या www.Yavatmal.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. अर्जदाराने आपले अर्ज आवश्यक माहितीसह व योग्य दस्तऐवजासह जिल्हा प्रशासन अधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे विहित मुदतीत सादर करावे. अटी व शर्ती कार्यालयात कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते ५.३० या वेळेत पाहता येईल.

१. अर्ज विक्री दि. : १६/०७/२०२६ ते ३०/०७/२०२६ पर्यंत
२. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : ३१/०७/२०२६
३. अर्जाची छाननी दि : ०३/०८/२०२६

पात्रता :

१. वर्षाचा आयुष्य वाल्याकडे, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत असावे.
२. संस्थेचे ०३ वर्षाचे अंकेक्षण अहवाल सादर करावे. (२०२३-२४, २०२४-२५, व २०२५-२६)
३. [illegible]
४. अभ्यासिकेत स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिले गुणक [illegible] देण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना असेल.

विभाग/अन./जाति/३३०/२०२६-२०२७ — जिल्हाधिकारी यवतमाळ — 15/7

CHANGE OF NAME

I, NASARULLA KHAN (OLD NAME) in PASSPORT NO. J9294710. Resident at PATHANPURA WARD NO 10 NER 445102. HAVE CHANGED MY NAME TO NASRULLAH KHAN AMRULLAH KHAN PATHAN (NEW NAME) FOR ALL FUTURE PURPOSES

Date: 14/07/2026

LEGAL NOTICE

(Inview of Publication In to News Paper)

To,
Dainik Vidharbh Matdar Yavatmal
From :- Saiyyad Akil Son of Saiyyad Hanif aged about 49 Years.
Occupation - Labourer
Mob no.8888646206
Through :- Adv. R. I. Mundhe
Civil Court Arni Dist. Yavatmal
Mob no.8888034058

1) That, I would like to serve Legal notice in view of Publication in to news paper

That, my client has been given authority to we in context of the publica-tion legal notice in to Daily newes paper namely Dainik Vidharbh Matdar Yavatmal.

2) That, as per mutation no.11547 form no.6 is in existence at there by 7/12 extract copy is available by the name of Shahista Parveen Mirza Arni. add measurement 78.75 squre plot no. 123/2,123/2/1/3 Class I this immovable property situated at Dattanagar Arni.

3) That, it is under the area of Municipality Arni.

That, immovable property belonges to Shahista Parveen Baig and she has been paid tax Municipality on dated 01/07/2026

4) That, if there is any right involved in connection of the legal heirs etc.

That, within i stipulated time be taken the objection i.e.one week after the pub-lication of legal notice.

Hence notice published within the ambit of law of notices

Sign
Arni
Date : 14/07/2026 — (Adv. R.I. Mundhe)

श्रीमती व्ही. डी. बिहारी २ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर पुसद ता. पुसद जि. यवतमाळ यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९१/२०२६
किरण भालेराव+२-वि-कोणीही नाही
ने.ता. १७/०८/२०२६

जाहीरनामा

अर्जदार- १. श्रीमती किरण अनिल भालेराव वय अं. ४६ वर्षे धंदा नोकरी, २. अंकीत अनिल भालेराव वय अं. २१ वर्षे, ३. वेदांत अनिल भालेराव वय अं.२३ वर्षे सर्व रा. मंगीलगड पुसद ता. पुसद जि. यवतमाळ.

-वि.-

गैरअर्जदार- कोणीही नाही.

ज्याअर्थी सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मयत अनिल काशीराव भालेराव हे अर्जदार क्र. १ चे पती व क्र. २ व ३ यांचे वडील होते. मयत अनिल काशीराव भालेराव यांचा मृत्यू दि. १३/०५/२००७ रोजी यशिम ता. जि. वाशिम येथे झाला. म्हणून या प्रकरणात अर्जदार यांनी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नं. VIII सन १८२७ च्या तरतुदीनुसार वरील प्रकरणातील अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत वरील दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जदार यांना वारस हक्क प्रमाणपत्र मिळणेकरिता कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत, उजर किंवा संबंध अथवा आक्षेप असल्यास लेखी स्वरूपात या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती लेखी स्वरूपात नोंदवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, सदरु कोणीही हजर न झाल्यास किंवा कोणाचाही आक्षेप न आल्यास, अर्जदाराचा अर्ज मंजूर करून कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्याची पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. १३/०७/२०२६ रोजी माझे सहीने न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले आहे.

तयार करणार — कनिष्ठ लिपीक — -आदेशानुसार- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, पुसद

Shri Gajanan Maharaj Sansthan's Pusad
Ayurved Mahvidyalaya, Pusad
Washim Road, Pusad Dist : Yavatmal (M.S.) 445 215
Ph. No. (07233) 246247 Fax - 247382
E-mail : ayurpusad@rediffmail.com
Recognized to NCISM New Delhi, Govt. of Maharashtra and affiliated to MUHS Nashik

WALK IN INTERVIEW- VACANCIES

Application are inviting on plain paper along with all necessary copy of certificate, form the eligible candidate till **05/08/2026 at 5.00 pm** for the fallowing posts. Qualification and Experience as per NCISM And MUHS Nashik, University Direction No. I/2017

Sr. No	Type of Posts	Vacant Post		
01	Principal	1 (Open)		
Sr.No.	Departments	Professor	Associate Professor	Assistant Professor
01	Samhita & Siddhant	1 (Open)	1 (Open),	1(Open), 1(Sc)
	Sanskrit	---	---	---
02	Rachana Sharir	1 (Open)	Not to be filled	1 (Open)
03	Kriya Sharir	Not to be filled	1 (Open)	1(Open), 1(Open)#
04	Dravyaguana	Not to be filled	1 (Open)	1(Open), 1(Open)#
05	Rasashastra evam Bhaishajya	1 (Open)	---	1 (Open)
06	Rognidan evam V. V.	1 (Open)	Not to be filled	1 (Open)
07	Swastha Vritta & Yoga	1 (Open)	---	1(Open)
08	Agad Tantra evam Vidhi V.	1 (Open)#	---	1 (open)
09	Prasuti evam Striroga	1 (Open)	1 (Open)	1(Open), 1(Sc)
10	Balrog (Koumarbhritya)	Not to be filled	1 (Open)	1(Open), 1(Sc)
11	Kayachikitsa	1 (open)	1 (Open)	1(Open), 1(Open)#
12	ShalyaTantra	1 (open)	Not to be filled	1(Open), 1(Sc)
13	Shalakya Tantra	1 (open)	---	1(Open), 1(Sc)
14	Panchakarma	Not to be filled	1 (Open)	1(Open), 1(Sc)

Note:- For detailed information about post, qualification, and other terms and conditions please visit college websits www.sgmayurpusad.com Last date of application is **Dt. 05/08/2026 at 05 pm.**
Eligible candidates are advised to remain present for personal interview along with original certificate on **Dt. 06/08/2026 at 10 am. At Ayurved Mahavidyalaya, Pusad, Washim Road, Pusad. Tq. Pusad Dist. Yavatmal.**

1. Principal, Professor, Associate Proffessor and Assistant Professor post Qualification & Experience as per NCISM & MUHS, Nashik Norms
2. Disqualifying the application is under authority of "The President" Ayurved Mahavidyalay, Pusad.
3. The Post (s) marked # is/are additional post (s) other than staffing pattern.

Send Soft copy on College, E Mail.ID-ayurpusad@rediffmail.com Sent Hard copy on college address. Principal, Ayurved Mahavidyalay, Pusad, At, Washim Road, Dist. Yavatmal- 445215
(E Mail.ID/ayurpusad@rediffmail.com) No TA/DA will be givin to Candidate. Note: Ad

Principal, Ayurved Mahavidyalaya, Pusad — President, Shri. Gajanan Maharaj Sansthan, Pusad

हे पत्र मुद्रक, मालक, प्रकाशक दिलीप लक्ष्मणराव एडतकर यांनी ममता प्रकाशन, सी-२६, औद्योगीक वसाहत, सातूर्णा, बडनेरा रोड, अमरावती-४४६५०५ (महा) येथे छापून दैनिक विदर्भ मतदार कार्यालय, शासकीय रुग्णालयासमोर, यवतमाळ- ४४५००१ (महा) येथे प्रकाशित केले. RNI NO : MAHMAR/2010/31001
संपादक: दिलीप लक्ष्मणराव एडतकर संपर्क: ९४२२८५५४९३ मुख्यालय: अमरावती-०७२३५२२६६, पुसद: अनिल पैठकारी-९४२२८५५४९३ Email: amravatidmatadar@gmail.com यवतमाळ-matadarytl@gmail.com पुसद-pusadmatadar@gmail.com
Printed, published and owned by Dilip Laxmanrao Yedatkar and Printed at Mamta Prukashan, C-26, Industrial Estate, Saturna, Badnera Road, Amravati-44605 (MAH) and Published at Vidarbha Matadar office, In front of Government Hospital, Yavatmal- 445001 (MAH) RNI NO: MAHMAR/2010/31001 Editor: Dilip Laxmanrao Yedatkar Contact: 9422855493 Email: dmatadar@gmail.com

Dt. 15/07/2026 विदर्भ मतदार

CamScanner